## पुष्प तिसरें

अध्यक्ष — र. के. खाडिलकर

वक्ते — शं. शां. मोरे

१० मे १९४९

ह्या विषय सुचविल्यानंतर व्याख्यानमालेच्या चालकांनीं या विषयावरती बोलतांना प्रत्येक वक्त्यानें थोडेसें संयम ठेऊन बोलावें व इतर पक्षांवर विशेष टीका करूं नये अशा स्वरूपाच्या अपेक्षा व्यक्त केल्या. संयुक्त महाराष्ट्र न होऊं देण्याबाबत करण्यांत येत असलेल्या कारवाया चीड आणणाऱ्या असल्यामुळें हा प्रश्न थोडा गरम होऊं लागलेला आहे. अशा या गरम प्रश्नाबद्दल नरमपणें बोलणें अशक्य झालें आहे. शांतपणें व संयम ठेऊन बोलणें आतां एखाद्या अहिंसावाद्यालाही साधू शकेल असें मला वाटत नाहीं. थोडेसें गरम डोकें हा महाराष्ट्राचा प्रकृती धर्मच आहे व तसें ठेवल्यासच हा प्रश्न सुटेल.

संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणाऱ्या लोकांवर प्रांतीयतेचा आरोप करण्यांत येतो. इतर कुणीही कांहींही केलें तरी त्याबद्दल त्यांना दोष न देतां असतील नसतील त्या दोषांचें सर्व खापर फक्त महाराष्ट्रीय लोकांच्याच डोक्यावर फोडण्यांत येतें. नेहरू आपण काश्मिरी आहोंत हें अभिमानानें सांगू शकतात, सरदार पटेल हे मद्रासला व इंदोरला गुजराथी समाजाकडून मानपत्रही घेऊं शकतात, पट्टाभी आपल्या प्रांतांतील काला व्यंकटराव यांना कॉंग्रेस कारिणीचे सरचिटणीस करूं शकतात पण त्यांची हीं कृत्यें प्रांतीयतेच्या सदरांत पडत नाहींत. महाराष्ट्रीय लोकांनीं संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणें

ही मात्र प्रांतीयता ठरते. या आरोपांत कितपत सत्य आहे याचा तात्विक दृष्टया विचार करणें जरूर झालें आहे.

स्वतंत्र भारत व संयुक्त महाराष्ट्र अशी केलेली विषयाची योजना फार चांगली आहे भाषावर प्रांतरचनेच्या तत्वाचा विचार करतांना स्वतंत्र भारताचा विचार करणेंही जरूर आहे. स्वतंत्र भारत हे शब्द उच्चारल्यानंतर पूर्वीचा आपल्या कल्पनेंतील भारत शिल्लक आहे कां ! व तो स्वतंत्र आहे कां ! असे दोन प्रश्न आपल्या पुढें येतात.

हिंदुस्थानची फाळणी आम्ही होऊं देणार नाहीं असे अनेकवार आश्वासन देणाऱ्या कॉंगेस पुढाऱ्यांनीं तडजोडीनें देशाच्या फाळणीस मान्यता दिली. त्यामुळें आजचा भारत हा खंडित आहे. अखंड नाहीं. स्वातंत्र्यही निर्भेळ नाहीं.

## मार्क्सवादी दृष्टीकोन

कारण सध्याचें स्वातंत्र्य हें तडजोडीचें स्वातंत्र्य आहे. तडजोडीत देवाण घेवाण होतेच. आपल्या पुढाऱ्यांनी वारंवार दिलेली अश्वासनें विसरून ही तडजोड कां केली हें पहावयास मार्क्सवादी दृष्टीकोनांतूनच परिस्थितीची छाननी केली पाहिजे. हिंदुस्थानांत प्रथमपासूनच चार वर्ग होते. त्यांतील पुरोहित व सरंजामदार वर्गानें ( ब्राह्मण क्षात्रियांनी ) हातांत हांत घालून श्रमजीवींना अज्ञानांत ठेवले. युरोपांत अशा वेळीं वैश्य वर्गानें बंड करून सत्ता बळकावली. हिंदुस्थनांतील वैश्य वर्गाची उणीव ब्रिटिश व्यापाऱ्यांनी भरून काढली व त्यांनींच हिंदी सरंजामशाहीचा निकाल लावला. मात्र आपल्या रक्षणासाठीं कांहीं संस्थानिक ठेवले.

## भांडवलवाल्यांच्या हातीं सत्ता

या ब्रिटिशांविरुद्ध हिंदुस्थानांत जें बंड झालें तें समाजांतल्या वरच्या थरांततलें होते. इंग्रज भांडवलवाल्यांच्या हातांतील सत्ता त्यांना आपल्या हातांत हवी होती. सुभाषबाबूंच्या आझाद सेनेमुळें व येथील ४२ सालच्या बंडामुळें ब्रिटिशांना घाम सुटला व ते तडजोडीस तयार झाले. ४२ सालच्या

बंडखोरीनें पुढाऱ्यांनाहि विचार करावयास लावलें होतें. ही बंडखोरी वाढूं दिली तर व्यापाऱ्यांना हे लोक भारी झाल्याशिवाय राहणार नाहींत अशी धास्तीहि वाटूं लागली. यामुळेंच ब्रिटिशांनी पुढें केलेला हात या लोकांनी स्वीकारला व स्वातंत्र्याची तडजोड झाली.

## आश्वासनें कोठें गेलीं ?

यानंतर पूर्वीचें सर्व ठराव व घोषणा डोहांत बुडविण्यांत आल्या. प्रौढ मतदानावर आधारलेली घटनासमिति बोलावण्यांत येईल हेंहि आश्वासन यापैकींच होतें. आज प्रौढ मतदानावरचा या लोकांचा विश्वासच उडूं लागला आहे असें दिसतें ! सध्यांची घटनासमिती कॉंग्रेसच्या कार्यकारिणी मधील पंधरा पुढाऱ्यांनीं निवडलेली आहे ! बुद्धीची स्वतंत्रता हा महाराष्ट्रीयांचें दोष आहे. यामुळें घटना समितींत महाराष्ट्रीयांचा आवाज उमटूं शकेल असा प्रतीनिधीच या मंडळींनीं येऊं दिला नाहीं. आज घटना तयार होत आहे. १९३५ च्या कायद्यांतील १३२ कलमें जशीच्या तशी या घटनेंत आहेत.

पंडित नेहरू यांनी लखनौ कॉंग्रेसचे अध्यक्ष या नात्यानें केलेल्या भाषणांत या घटनेवर कडक अशी टीका केली होती. 'ही गुलामगिरीची सनद आहे. ब्रिटिश भांडवलवाल्यांकडून हिंदुस्थानांतील जनतेची जी पिळवणूक होत आहे ती पिळवणूक अबाधितपणें चालू ठेवण्यासाठींच ही घटना जन्माला आलेली आहे' अशी पंडितजींनीं टीका केली होती. असें असतांही या १९३५ च्या कायद्यांतील इतकीं सर्व कलमें नवीन घटनेंत कां समाविष्ट करण्यांत आलीं !

या प्रश्नाला उत्तर देतांना आपणास पुन्हां मार्क्सवादाचा विचार करावा लागेल. देशांत अनेक वर्ग असतात. त्यापैकीं एक वर्ग हा आपल्या हातें खालच्या वर्गाच्या मदतीनें सत्ता घेतो. परंतु ती सत्ता घेतली कीं तो वर्ग बाकीच्या खालच्या वर्गांना दडपून टाकण्यास उपयोगी पडणारें, स्वतःच्या सोईचें शासन यंत्र तयार करतो व हें शासन यंत्र तयार करतांना खालचे

वर्ग बंद करूं शकणार नाहींत व आपल्या सत्तेस ग्रहण लावणार नाहींत अशा तऱ्हेची तरतूदही करतो.

ब्रिटिशांनी १९३५ च्या कायद्यांत अनेक कलमें आपल्या व्यापाऱ्यांच्या फायद्यासाठीं घातलीं होती. सदर कायद्याची योजनाच स्वातंत्र्याची मागणी करणाऱ्या हिंदी लोकांच्या हातांत राजसत्ता जाऊं नये यासाठीं केली होती. ब्रिटिश व्यापाऱ्यांशीं तडजोड करून अधिकार मिळविणारें कॉंग्रेस श्रेष्ठी व हिंदी भांडवलदार आतां त्याच चालीवर चालून नवीन घटनेनें आपल्याच हातांत सत्ता राहील याबद्दल खबरदारी घेत आहेत. भांडवलवाले व त्यांचे हस्तक यांनीं भरलेल्या दिल्लीच्या घटना परिषदेंत दिल्ली; कानपूर, अमदाबाद, मुंबई येथील भांडवलवाल्यांच्या हिताचें रक्षण करणारें शासन यंत्र तयार होत आहे.

## एकतंत्री घटना

कोणाचीहि मिळकत मोबदला दिल्या शिवाय काढून घेतां येणार नाहीं असें एक कलम या घटनेंत असल्यामुळें जमीनीचें, उद्योगधंद्याचें राष्ट्रीयकरण करण्याचीं पूर्वीची घोषणा घोषणाच ठरली आहे. ही घटना अगदीं एकतंत्री. असून मध्यवर्ती सरकारची हुकूमशाही करण्याचा हा एक प्रयत्न आहे. ही संघराज्याची घटना तर खचित नाहीं. प्रांतांतून किसान, कामगार जागे होऊं लागले असल्यामुळें कांहीं प्रांतांत राष्ट्रीयीकरण होण्याचा संभव वाढला आहे. त्याला आळा बसावा यासाठींच ही एकतंत्री घटना बनविण्यांत येत आहे.

## ही लोकशाही कसली ?

निवडणुकीचा तर नुसता फार्स चालला आहे. प्रत्येक मतदारास मतदानाची सक्ति करा ही आमची सूचना भांडवलवाल्यांस मानवणार नाहीं. म्हणून घटनेंत समाविष्ट करण्यांत आली नाहीं. या घोषणेनें लोकशाही अंमलांत येऊं शकणार नाहीं, यामुळें लोकशाही मार्गानें समाजवाद निर्मिता येईल या गोष्टीवरील माझा विश्वास उडाला आहे.

## भाषावार प्रांतरचना

या भूमिकेवरून संयुक्त महाराष्ट्राचा विचार करा. कॉंग्रेसने अनेकवार हें तत्व मान्य केलें असून भाषावार प्रांतांची पुनर्रचना व्हावी अशी मागणीहि केली होती. १९३५ सालच्या कायद्यानुसार सिंध, ओरिसा हे प्रांत निर्माण झाले तरी महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटक यांचा प्रश्न भिजत पडला. कॉंग्रेस पुढाऱ्यांचा आशीर्वाद असल्यामुळें आंध्र प्रांत आज वेगळा झाल्यासारखाच आहे. कर्नाटकहि होईल. पण खरें दुःख महाराष्ट्राच्या वाट्यास आलें आहे. नवी हिंदी घटना १५ ऑगस्टपर्यंत पास होणारच. त्यापूर्वीच संयुक्त महाराष्ट्र निर्माण व्हावयास हवा.

## मांडवलवाल्यांची हाराकिरी

या प्रकरणीं भांडवलवाल्यांना एवढी कां खुटखुट लागावी ? महाराष्ट्राची पिंड प्रकृती त्यांना माहिती असल्यामुळें नवा महाराष्ट्र निर्माण होणें म्हणजे आपली ती हाराकिरीच ठरेल याची त्यांना जाणीव आहे.

पूर्वी दादाभाई नवरोजी सारख्या पुढाऱ्यांना आपण साधार व संयुक्तिक अशी आपली बाजू मांडली कीं ब्रिटिश लोक न्याय्य बुद्धीनें वागून आपलें म्हणणें मान्य करतील असें वाटत असे. त्यासाठीं ते जरूर तें लिखाण लिहीत होते व वक्तव्य करीत होते पण अखेर मुद्दे सोडून हिंदुस्थानला स्वातंत्र्यासाठीं लढा करणें भाग झालें. आजही आमचे कांहीं पुढारी संयुक्त महाराष्ट्र कां निर्माण झाला पाहिजे व मुंबई महाराष्ट्रांत का राहिली पाहिजे या प्रश्नाबाबत आधारयुक्त विवेचन करणारे प्रबंध लिहीत आहेत. या प्रबंधातील माहितीनें परप्रांतीय भांडवलवाल्यांचें मतपरिवर्तन होऊन ते संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्यास अनकूल होतील असें समजणें चुकीचें आहे. त्यांच्या वर्गीय हिताविरूद्ध संयुक्त महाराष्ट्र जाणार असल्यामूळें ते कडवा विरोध करीत आहेत. संयुक्त महाराष्ट्र निर्माण होण्यास भांडवलशाहीचा खरा विरोध आहे. महाराष्ट्राची परंपरा पाहुनच भांडवलवाले विरोध करीत आहेत.

## महाराष्ट्राची प्रकृति

महाराष्ट्राचा इतिहासच तसा आहे. धार्मिक विषमतेविरुद्ध बंड करणारे अनेक संत येथें निर्माण झाले व त्यांनीं ती विषमता दूर केली. यांतच ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम मोडतात. या संतांच्या प्रचारामुळें जागृत झालेला दलित शेतकरी समाज शिवाजीभोंवती गोळा झाला, आणि त्यांनीं क्रांतीची सुरवात केली. या अर्थानें शिवाजीचें राज्य खरेखुरें लोकराज्य होते आणि म्हणूनच त्याकाळचे मुसलमानाच्या नोकरींत असलेले मराठ्यांतील सरदार, इनामदार, वगैरे लोक शिवाजीमहाराजांस विरोध करीत होते. शिवाजीनंतर कांहीं कालानें महाराष्ट्रांत प्रतिक्रांतीचें वारें शिरलें व आपण फिरून पारतंत्र्यांत पडलों.

## संयुक्त महाराष्ट्र हें साधन

श्रमजीवि समाज सुखी व्हावा, महाराष्ट्रांत आर्थिक समता यावी या साध्यासाठीं संयुक्त महाराष्ट्र हें आमचें साधन आहे. हा भाषावार प्रांत-रचनेचा प्रश्न नसून वर्गीय लढ्याचा एक भाग आहे. आज संयुक्त महाराष्ट्र होत नाहीं असें माझें मत आहे.

## कार्यक्रम

संयुक्त महाराष्ट्र होण्यासाठीं काय करावें हा आपल्यापुढें प्रश्न उभा आहे. साथी गोरे यांनी काल आपल्या भाषणांत महाराष्ट्रीय आमदारांनी अधिवेशनावर कांहीं काळ बहिष्कार घालावा असें सूचविलें. या असल्या मलमपट्टीनें आप-णास ठसठसणारें बंड शमणार नाही. आमदार राजिनामे देण्यास तयार होतील अशीच परिस्थिती आपण प्रांतांत निर्माण केली पाहिजे व त्यासाठीं अखेर करबंदीपर्यंत जाणारे कार्यक्रम आंखले पाहिजेत.

## कॉंग्रेस विरुद्ध आघाडी

या लढ्याचा कार्यक्रम तयार करून अमलांत आणण्यासाठीं महाराष्ट्रांतील सर्व लोक एका आघाडींत आले पाहिजेत. परंतु ही आघाडी निर्माण करतांना

आम्ही कॉंग्रेसवाल्यांना खड्यासारखे बाजूला केले पाहिजे. महाराष्ट्रांतील कॉंग्रेस पुढाऱ्यांतून वर गेलेले देव, गाडगीळ हे या कामीं लटक्या चळवळीचे नाटक करून राहिलेले आहेत. नेहरू, पटेल यांच्या विरुद्ध लढण्याची त्यांची कुवत नाही. संयुक्त महाराष्ट्र विरुद्ध कॉंग्रेस असा आजचा लढ्याचा पवित्रा असल्यामुळें संयुक्त महाराष्ट्रासाठीं लढणारा मनुष्य कॉंग्रेसमध्यें राहूंच शकत नाही. समाजक्रांतीची उठावणी महाराष्ट्रांतून होईल. त्यासाठीं महाराष्ट्राची भूमी तयार आहे. हिंदुसभासुद्धां सर्व पक्षाच्या महाराष्ट्रीयांनी ( कॉंग्रेस वगळून ) संयुक्त महाराष्ट्रासाठीं आज एक झालें पाहिजे.

## अध्यक्षीय समारोप

आतांपर्यंत श्री शंकरराव मोरे यांच्या भाषणावरून किती व्यापक भूमिके-वरून संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाचा विचार झाला पाहिजे हें आपल्या ध्यानीं आलें असेल. आजच्या मध्यवर्ती सरकारचें स्वरूप व धोरण हीं समजून घेत-ल्यावाचून संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाचें भवितव्य काय होणार हें निश्चित करतां येत नाहीं. ज्या कॉंग्रेस श्रेष्ठिंच्या हातीं केंद्रीय सत्तेचीं सूत्रें आहेत ते लोक प्रांतांच्या पुनर्रचनेच्या प्रश्नाकडे लोकशाहीच्या दृष्टीनें पाहात नाहींत. त्या-मुळेंच आज प्रांतवाद किंवा भाषावाद म्हणून जो वाद ओळखला जातो त्याला तीव्रता येत चालली आहे.

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही मुलतः लोकशाही भूमिकेवरून उभारण्यांत आलेली सांस्कृतिक व भाषिक अशी चळवळ आहे. गुजराथी ' अस्मिता ' जागृत होऊन तिचा विकास व्हावा यासाठीं धडपडणारे श्रीयुत कन्हय्यालाल मुनशीसारखे लोक महाराष्ट्राच्या अस्मितेला चिरडून टाकूं पहातात ही गोष्ट निसंशय चीड आणणारी आहे. हिंदी संघराज्याचे घटक या देशांत खरीखुरी जनतेच्या हातीं सत्ता राहील या दृष्टीनें ठरविण्यांत यावेत. त्यायोगें संघराज्याला बळकटी येईल इतकेंच नव्हे तर जनतेच्या व्यापक सांस्कृतिक जीवनाच्या विकासाचा मार्गही खुला होईल. इंग्रजी सत्ता येथें असतांना जी एक सामाजिक

चौकट किंवा साचा तयार झालेला होता तो तसाच कायम राहावा या इराद्यानें काँग्रेस श्रेष्ठी आपलीं धोरणें ठरवींत आहेत. त्यामुळें केवळ सत्तावादाखेरीज कोणतेंच ध्येय त्यांच्यापुढें उरलेलें नाहीं. Machiavelli Politics असें ज्याला म्हणतात त्या राजकारणाचा अंगिकार सत्तावादी नेते करीत आहेत. त्यामध्यें साध्य आणि साधन यांच्या शुद्धतेचा विचारसुद्धा नाहीं. दिवसेंदिवस धनिकांच्या आहारीं जाऊन आखण्यांत आलेलें हें धोरण राष्ट्राची खच्ची करणारें, संघराज्याला दुर्बल बनविणारें आणि लोकांचा असंतोष वाढविणारें ठरणार आहे असा इशारा मी देऊं इच्छितों.

महाराष्ट्रांतील काँग्रेस नेत्यांना काँग्रेसच्या शिस्तींत राहूच संयुक्त महाराष्ट्र घडवून आणावा याबद्दल कितीही आतुरता असली तरी आत्ताच दिग्दर्शित केलेलें केंद्रीय सरकारचें धोरण विचारांत घेतां त्यांच्या हातून आणि त्यांच्या मार्गानें हा प्रश्न सोडविला जाईल असें मला वाटत नाहीं. परवाच श्री. काकासाहेब गाडगीळ यांनीं ' वांका आणि जिंका ' (Stoop to conquer) असा काँग्रेस श्रेष्ठींच्या अनुनयांचा नवा मार्ग महाराष्ट्रीयांपुढें ठेविला आहे. खरोखरच काकासाहेबांनीं दाखविलेल्या पद्धतीचा अंगिकार केल्यामुळें संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती तात्काळ होणार असेल तर महाराष्ट्रांतील लोक पाठीचा कणा ढिला होईपर्यंत वांकलेल्या पवित्र्यांत उभे राहतील. परंतु ही संयमाची भाषा अनुभवानें निरुपयोगी ठरलेली आहे. केवळ सत्तावादाचा अंगिकार करणाऱ्या काँग्रेस नेत्यांकडून याबाबतींत महाराष्ट्राला न्याय मिळेल असें मला बिलकूल वाटत नाहीं. आणि म्हणूनच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीला श्री. मोरे यांनी सांगितल्याप्रमाणे वर्गीय लढ्याचें स्वरूप येणें अपरिहार्य झालें आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीची उभारणी जास्तींत जास्त व्यापक पायावर व्हावी आणि महाराष्ट्रांतील सर्व पक्षांचें सहकार्य या चळवळीला लाभावें अशा धोरणानें संयुक्त महाराष्ट्र परिषद बनविण्यांत आलेली आहे. या व्यासपिठावर श्री. शंकरराव देव यांच्या एका बाजूला श्री. धनंजयराव गाडगीळ आहेत,

दुसऱ्या बाजूला श्री. केशवराव जेधे आहेत, पाठीशीं म. म. पोतदार उभे आहेत. आणि या परिषदेनें संयुक्त महाराष्ट्रांच्या चळवळीला मूर्त स्वरूप आणलें आहे. तेव्हां आज हा प्रश्न निकरावर आलेला असतांना आणि गोड समजुतदारपणा ( Sweet reasonableness ) दाखवून तो सोडविला जाईल अशी अशा करण्याला जागा उरलेली नसतांना परिषदेचें व्यासपीठ निरुपयोगी ठरत आहे असा विचार मनांत येणें स्वाभाविक होय. पण माझे मित्र श्री. ना. ग गोरे यांनीं सांगितल्याप्रमाणें संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळींचें सर्व समावेशक धोरण आत्तांच सोडून देणें उचित होईल असें मला वाटत नाहीं. तिथां कॉंग्रेस श्रेष्ठींच्या समितीनें प्रभावी लोकमत बनविण्याचें आपणाला आव्हान दिलें आहे. त्याचा स्वीकार करून वातावरण तापविल्यास श्री. शंकरराव देव किंवा काकासाहेब गाडगीळ महाराष्ट्राकडे पाठ फिरवून स्वस्थ बसतील असें मला वाटत नाहीं. जे प्रांतद्रोह करतील किंवा फितूर होतील त्यांना संयुक्त महाराष्ट्रांतील जागृत लोकमत वेळींच ताळ्यावर आणल्यावाचून राहाणार नाहीं.

मी आरंभी म्हटल्याप्रमाणें हिंदुस्थानच्या कॉंग्रेस श्रेष्ठींशी झगडा दिल्यावाचून संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न सुटणार नसल्या कारणानें इतर प्रांतातील लोकशाही दृष्टीनें सुरू असलेल्या चळवळीशीं आपण आतां दुवा जोडला पाहिजे, ही माझे मित्र श्री. एस्. एम्. जोशी यांनीं केलेली सुचना तात्काळ विचारांत घेतली पाहिजे. त्याकरतां इतर प्रांतांतील जनतेचें सहकार्य आपल्याला मिळेल अशा धोरणानें ही चळवळ यापुढें चालविली पाहिजे. मध्यवर्ती सत्तेशीं टक्कर देण्याची तयारी केली पाहिजे. यामध्यें हिंदुस्थानांतील बड्या भांडवलदारांच्या हितसंबंधाचें रक्षण करणारे कॉंग्रेस श्रेष्ठी एका बाजूला आणि बहुजन समाज दुसऱ्या बाजूला असा हा संघर्ष होणार आहे. कितीही संयम आणि सहनशीलता दाखविली तरी तो टाळतां येईल असें वाटत नाहीं.

इंग्रजी सत्तेची झांपड हिंदी जनतेवर पडलेली असतांना लोकशाही पद्धतीनें चळवळ उभारण्याचा पहिला उपक्रम महाराष्ट्रांत झाला. याबद्दल आपल्याला

रास्त अभिमान वाटतो. परकीय सत्ता गेल्यानंतर सुरू झालेल्या नव्या युगांत लोकशाही पद्धतीनें जनतेच्या हातीं सत्ता जाण्यासाठीं जो लढा उभारावा लागणार आहे त्यामध्यें सुद्धां महाराष्ट्रालाच पुढाकार घ्यावा लागणार आहे. ही आनंददायक घटना आहे असें मीं मानतों. या संघर्षामुळेंच महाराष्ट्रीय जनता संघराज्याच्या स्थैर्यांत व धैर्यांत भर घालीत आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळी मध्यें येत चाललेली वाढतीं तीव्रता, त्या चळवळीला अपरिहार्यपणें येणारी वर्गीय धार आणि लोकशाही निष्ठ समाजवादी हिंदुस्थान निर्माण करण्याची आपल्यावर येऊन पडलेली जबाबदारी या गोष्टींची जाणीव ठेऊन झुंझार वृत्तीनें दोन अडीच कोटी मराठी भाषिकांचा संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्यासाठीं निर्धारानें आपण लढा दिला पाहिजे , तरच हा प्रश्न सुटेल.